# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतरासंबंधी विचार

**डॉ. सुनीता संतोष खडसे ,** सहयोगी प्राध्यापिका आणि इतिहास विभागप्रमुख ,श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय , सांगली

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेवृत्वाखाली अस्पृश्य समाजाने केलेले धर्मांतर ही फार मोठी क्रांतीकारक घटना होती. बाबासाहेबांचा धर्मांतराचा निर्णय हा तातडीने, आताततयीपणे घेतलेला निर्णय नव्हता तर त्याला जवळपास पसतीस वर्षांच्या प्रदीर्घ विचारमंथनाची व धर्म चिकित्सेची पार्श्वभूमी होती. बालपणापासून बाबासाहेबांनी जातीव्यवस्थेच्या दाहक विषमतेचे कडवट अनुभव सोसले होते. मग तो प्रसंग गाडीवानाचा असो, फळयावर लिहितांना फळयामागील स्पृश्य मूलांच्या फराळाच्या डब्यांचा असो, शाळेत पाण्यावाचून तहानेने तडफडण्याचा असो की बडोध्याला नोकरी करताना शिपायांकडून आलेले कटू अनुभव असो. बालपणीच्या व नंतरच्या कळात अस्पृश्यतेच्या प्रत्यक्ष आलेल्या अनुभवांमुळे बाबासाहेबांनी अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला. भारतीय जातीव्यवस्था व धर्मव्यवस्था यांनी अस्पृश्यांचे जीवन कशाप्रकारे नरकमय केले याचे सखोल चिंतन व मनन केले. आपल्या सार्वजनिक जीवनकार्याची सुरुवात बाबासाहेबांनी साधारणत: १९२० च्या सुमारास केली. १९२० मध्ये त्यांनी समाजजागृतीसाठी मूकनायक हे वृत्तपत्र सुरु केले त्यातील बहुतांश लेख हे बाबासाहेबांनी स्वत: लिहिले होते त्यातून त्यांची हिंदूधर्म विषयक चिकित्सा, जातीव्यवस्थे संबंधीचे विचार विषमतेबदद्लची चिड या गोष्टी लक्षात येतात याचाच अर्थ त्यांनी धर्मांतराची घोषण १९३५ साली केली असली तरी धर्मांतराचे विचार त्यांच्या मनात १९२० पासूनच निर्माण होत गेले असावेत. त्यासाठी प्रथम त्यांनी आपल्या बहिष्कृत समाजबांधवांना आपल्या सद्य स्थितीची, होणा—या अपमानाची जाणिव करुन दिली. ''बहिष्कृत तरुणांनो याचा विचार कराल काय? नुसत्या टाळकुटीने किंवा पोथीपुराणे वाचण्याने अमचा अपमान टळून तुम्हाला मोक्ष मिळेल? ज्या पुराणांतरी, अर्जुनाने नीच म्हणतांच बब्रुवाहव पुत्राने युध्द केले, ते कशासाठी? तर अपमान टाळण्याकरीताच ना? मानेने लात मारताच लहान ध्रुव बाळने अरण्यावास पत्करिला? लातेचा अपमान सहन न होवून कोपशमनार्थ त्याने ईश्वराचाच धावा केला ना? रणामध्ये जयद्रथाने अभिमन्युला लात मारतांच त्याने बाण टोचल्याप्रमाणे आकांत केला, व अर्जुनाने उद्या जयद्रयाचा वध करीन असा पण केलेला ऐकून अभिमन्यूने प्राण सोडला. सैरंध्री दासीला अपमान सहन न होवून तिने कीचकाचा प्राण घेवविला. द्रौपदीचा अपमान सहन न होवून कर्णास पांडवांच्या हाती बांधून आणाले. नैवद्य खाल्ला नाही; हा आपला अपमान झाला म्हणून नामदेव देवळांत रडत बसला ! त्याचप्रमाणे वहया बुडविल्याचा अपमान तुकारामासही सहन झाला नाही. मग या आमच्या बहिष्कृत समाजाच्या सहन शिलतेचा रबर किती ताणणार? आपल्याला खरोखरच मनुष्य व्हावयाचे आहे ना? किंवा धनगराच्या मेंढरांच्या कळपांतील सिंहाप्रमाणे प्रत्यक्ष सिंह असून मेंढरेंच म्हणवून घेणार? तसे नसेल तर अन्याय सहन न होणे, हेच मनुष्याच्या मनाचे उन्नत स्वरुप होय. हे लक्षात ठेवा. जुलूम सहन करण्याची सवय एकदा चित्ताला जडली म्हणजे मनुष्यत्वाच्या उच्च पायरीवरुन खाली अधोगतीकडे पडण्यास मुळीच वेळ लागत नाही.'' [१] बहिष्कृत समाजाच्या अधेगतीला त्यांची सोशिकता व अन्याया विरुध्द पेटून न उठण्याची वृत्ती कारणीभूत आहे असा मौलिक सल्ला या वर्गाला देवून त्यांच्या मन व बुध्दीवरील साठलेली काजळी प्रथम बाबासाहेबांनी दूर केली. आपला सामाजिक दर्जा त्यांच्या चालीरीतीचे अनुकरण करुन केव्हांही वाढणार नाही. तर आम्ही आमचा निस्तेज स्वभाव टाकून देणे हेच आमचा सामाजिक दर्जा वाढविण्याचे खरे साधन आहे असे बाबासाहेबांचे मत होते. बहिष्कृत भारताच्या चौथ्या अंकामध्ये धर्मांतराच्या विचाराचे सुतोवाच करताना बाबासाहेब म्हणतात की, ''अस्पृश्य लोक काही बाबतीत जरी बलहीन असले तरी सर्वच बाबतीत ते दुर्बल आहेत असा गैरसमज कोणीच करुन घेवू नये. आज हिंदुधर्मावर अस्पृश्य लोकांनी बहिष्कार पुकारला व मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली तर हिंदू समाजाचे काय होईल याचा स्पृश्य हिंदूनी अवश्य विचार करावा आज अस्पृश्यलोक हिंदू जर राहिले तरच आर्यधर्माची संरकृती या देशात निभावणार आहे. उलट ते जर हिंदूचे मुसलमान झाले तर या देशांत आर्यसंस्कृतीचा पाडाव होवून यावनी संस्कृतीचे प्राबल्य होणार आहे आणि या घडामोडी घडवून आणण्याचे सामर्थ्य एकटया अस्पृश्यवर्गात आहे, दुस—या कोणात नाही,

यात बिलकूल संदेह नाही. मुसलमानांना आपल्या शिवाय जय नाही व हिंदूना आपल्याशिवाय गती नाही एवढेच जर आमच्या अस्पृश्यबंधूनी ध्यानात घेतले तर त्यांच्या अंगी केवढे सामर्थ्य साठविलेले आहे याची त्यांना कल्पना होईल'' [2] तत्कालीन परिस्थितीत चालू असलेल्या हिंदू —मुस्लिम संग्रामात अस्पृश्यांच्या संख्येचे बलाबल फार महत्वाचे होते. व त्याचा विचार करुन तरी हिंदू धर्मिय अस्पृश्यता घालविण्याचा प्रयत्न करतील असा बाबासाहेबांचा विचार होता. बाबासाहेबांचे धर्मांतर म्हणजे हिंदू धर्मातील विषमतेला कंटाळून त्यांनी बौध्द धर्माचा केलेला स्विकार अशी अतिशय वरवरची माडणी करत असताना ब—याचदा या बाबीकडे दुर्लक्ष होते की, बाबासाहेबांची ही धम्मक्रांती समग्र समाजपरिवर्तनाची नांदी होती. अस्पृश्यांनाच नव्हे तर हिंदू धर्मीयांना देखील मुक्तिचा आणि समतेचा एक नवा मार्ग त्यातून मिळणार होता मात्र धर्मांतरानंतर धर्मांतराचे महत्व व वास्तविक स्वरुप भारतासमोर आपल्या अनमोल बुध्दीवादाने मांडण्याइतका वेळ निसर्गाने बाबासाहेबांना दिलेला नव्हता आणि त्यांच्यानंतर त्यांचे म्हणने तितक्याच ताकदीने मांडू शकेल असे खंबीर नेतृत्व नवबौध्द समाजाकडे नव्हते. त्यामुळेच धर्मांतरामागची वास्तविक भूमिका समाजापर्यंत पोचविण्यात आंबेडकरी चळवळ आंबेडकरांनंतर अयशस्वी ठरली आणि परिणामी धर्मांतराबदद्लचे अतिशय वरवरचे आकलन हिंदू समाजात निर्माण झाले. बाबासाहेबांनी १९३५ मध्ये येवले मुक्कामी आपली प्रसिध्द अशी धर्मांतराची घोषणा केली. मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही असा ठाम इशारा हिंदू धर्मीयांना दिला. मात्र त्यानंतर १९३५ ते १९५६ असा प्रदीर्घ काळ त्यांनी धर्मांतराच्या आपल्या विचाराचे परिक्षण व चिकित्सा केली. धर्मांतरामागची त्यांची भूमिका त्यामुळेच अतिशय सखोल व विचारप्रवर्तक होती. बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या प्रवासाचे साधारणत: ढोबळमानाने टप्पे पाडायचे म्हटले तर ते पुढीलप्रमाणे पाडता येतील.

१. अस्पृश्यतेचे दाहक अनुभव
२. बहिष्कृत समाजाचे निरीक्षण
३. जातीव्यवस्थेची चिकित्सा
४. हिंदू—धर्माची चिकित्सा
५. धर्मांतराचे विचार
६. धर्मांतराची घोषणा
७. हिंदू धर्मात सुधारणेला सवड
८. धम्मक्रांती.

धर्मांतराची घोषणा केल्यानंतर बाबासाहेबांनी आपल्या बांधवांना धर्मांतराचे महत्व पटवून देण्यासाठी जी अनेक व्याख्याने दिली त्यातून त्यांचे धर्मांतराबाबतचे विचार जाणून घेण्यास मदत मिळते. ''धर्मांतर हा मौजेचा विषय नव्हे. हा माणसाच्या जीविताच्या साफल्याचा प्रश्न आहे. जहाजातून एका बंदराकडून दुस—या बंदराला नेण्याकरीता नावाडयाला जेवढी पूर्वतयारी करावी लागते, तेवढीच पूर्वतयारी धर्मांतराकरिता करावी लागणार आहे. त्याशिवाय हा तीर सोडून पैलतीर गाठणे शक्य होणार नाही. परंतु नावेत किती उतारु येतात याचा अंदाज समजल्याखेरीज नावाडी सामानसुमान जमविण्याच्या प्रयत्नात लागत नाही. त्याचप्रमाणे माझीही स्थिती आहे. किती लोक धर्मांतर करावयास तयार आहेत याचा कयास लागल्याशिवाय मला धर्मांतराची पूर्वतयारी करण्याच्या उद्योगाला लागणे शक्य नाही.''[3] धर्मांतराचा विषय हा अतिशय महत्वाचा व तितकाच गहन असल्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या अनुयांच्या आकलनासाठी त्याची अतिशय सोपी मांडणी करण्याचा प्रयत्न केला होता.

**धर्मांतराची ऐहिक कारणे :—**

बाबासाहेबांनी धर्मांतराचा सामाजिक, धार्मिक तसेच तात्विक दृष्टीकोनातून विचार केला होता. तो करत असताना सर्वप्रथम त्यांना अस्पृश्यता ही संकल्पना काय आहे तिचे नेमके स्वरुप कसे आहे यासंबंधी विचार माडणे गरजेचे वाटले. त्यांच्या मते ज्याला स्पर्श झाला असता स्पृश्य व्यक्तीला विटाळ होतो ती व्यक्ती म्हणजे अस्पृश्य होय. ''अस्पृश्यतेचा प्रश्न हा वर्गकलहाचा प्रश्न आहे. स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन समाजातील तो कलह आहे. एका माणसावर होत असलेल्या आगळिकीचा हा प्रश्न नव्हे. एका माणसावर होत असलेल्या अन्यायाचा हा प्रश्न नव्हे. एका वर्गाने दुस—या वर्गावर चालविलेल्या आगळिकीचा हा प्रश्न आहे. एका वर्गाने दुस—या वर्गावर चालविलेल्या अन्यायाचा हा प्रश्न आहे. हा वर्गकलह सामाजिक दर्जासंबंधीचा

कलह आहे एका वर्गाने दुस—या वर्गाशी वागताना आपले वर्तन कसे ठेवावे या संबंधाचा हा कलह आहे ''[४] त्यामुळेच विहिरीवर पाणी भरल्यामुळे,घोडयावरुन वरात नेल्यामुळ, इतकेच नव्हे तर उंची पोषाख घातल्यामुळे, तांब्या पितळेची भांडी वापरल्यामुळे, जमिन खरेदी केल्यामुळे, जानवे घातल्यामुळे, मलेली गुरे न ओढल्यामुळे, मेलेल्या गुरांचे मांस न खाल्यामुळे, पायात बुट व मोज घालून गावातून गेल्यामुळे, स्पृश्य हिंदुस जोहार न घातल्यामुळे, शौचास जाताना तांब्यात पाणी नेल्यामुळे अस्पृश्यांना स्पृश्याकडून मारहानण होत असे. थोडक्यात माणूस म्हणून माणसाला एक चांगले जीवन जगण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांपैकी कोणताही छोटासा प्रयत्न केला तरी अस्पृश्यांना प्रचंड मारहाण केली जात असे, त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात येत असे. हे स्वाभिमान शून्य जीवन फेकून देऊन त्यांना स्वाभिमानाचे जीवन जगायचे होते त्यांना स्वसामर्थ्याने उभे करणे बाबासाहेबांना आवश्यक वाटत होते. त्यामुळेच त्यांनी धर्मांतराची जी कारणे विशद केली त्यातील पहीले कारण होते.

**सामर्थ्य प्राप्त करणे —**

बहिष्कृत समाजाकडे मनुष्यबळ, द्रव्यबळ व मानसिक बल या तिन्ही बलांचा अभाव आहे ही

बाब बाबासाहेबांना चांगली माहिती होती. अस्पृश्यांच्याकडे सांघीक शक्तीचा अभाव असल्यामुळे समुह म्हणून असणारी त्यांची ताकद स्पृश्य वर्गाच्या अत्याचारांना तोड देण्यास कमी पडत होती. शतकानुशतके अस्पृश्यांच्या पिढयानपिढयांनी स्पृश्यांकडून होणारा छळ निमुटपणे सोसल्यामुळे वारसाहक्काने हे सोसण्याचा सोशिकपणा आपोआपच अस्पृश्य कुटुंबात जन्मलेचा व्यक्तीमध्ये येत असे किंबहूना त्याची जडण—घडण अशी मानसिक न्यूनगंडाच्या वातावरणात होत असल्यामुळे बंड करुन उठवण्याची वृत्ती थंड पडली होती. नैराश्य व नामर्दुमकीचा इतका प्रभाव होता की आपणामध्ये काही करण्याची कुवत आहे हेच हे लोक विसरुन गेले होते. अश स्थिती मध्ये निमुटपणे अन्याय सहन करण्यापेक्षा हिंदू धर्माचा त्याग करुन दुस—या धर्माचा स्विकार करावा कारण अस्पृश्य जर मुस्लिम किंवा ख्रिश्चन झाले तर स्पृश्य हिंदू त्यांचा विटाळ मानत नसत मात्र हिंदू म्हणून राहिला तर हिंदूनांच उस्पृश्यांचा विटाळ होत असे, बाबासाहेबांच्या मते गावात मुसलमानांची फक्त दोनच घरे असली तरी त्यांच्यावर अत्याचर करण्याची कुणाची हिंमत होत नाही कारण त्या मुसलमानांच्या पाठीमागे संपूर्ण देशातील मुसलमान समाज असतो म्हणून त्यांच्यावर अन्याय करण्याची हिंमत सवर्ण हिंदूना होत नाही. अस्पृश्यांच्या बाबतीत मात्र अशा कोणत्याही पाठबळाचा अभाव असल्यामुळे गाावात त्यांची दहा घरे असली तरी त्यांच्यावर अत्याचार होतो. कारण हिंदूना खात्री असते की अस्पृश्यांच्या मदतीला कुनिही धावून येणार नाही. सहाजिकच सामर्थ्य नसल्यामुळे आत्याचार निमुटपणे सोसावे लागतात. आणि आजघडीला हे सामर्थ्य अस्पृश्यांच्या अंगी नाही त्यामुळे कुणाच्या तरी पाठीब्याने हे सामर्थ्य प्राप्त करण्याशिवाय गत्यंतर नाही. कोणत्या तरी अन्य समाजाचा ऋणानुबंध तुम्ही जोडल्याशिवाय, कोणत्या तरी अनय धर्मात तुम्ही सामिल झाल्याशिवाय तुम्हाल बाहेरचे सामर्थ्य मिळू शकत नाही याचाच स्पष्ट अर्थ असा आहे की, तुम्ही धर्मांतर करुन कोणत्यातरी अन्य समाजात अंतर्भूत झाले पाहीजे, त्याशिवाय तुम्हाला त्या समाजाचे सामर्थ्य प्राप्त होऊ शकणार नाही. आणि जोपर्यंत तुमच्या पदरी समर्थ्य नाही, तोपर्यंत तुम्हाला व तुमच्या भावी पिढीला आजच्या दीनवाण्या स्थितीमध्ये दिवस काढावे लागणार आहेत.

**धर्मांतराची आध्यात्मिक कारणे :—**

**आत्मोन्नती व समता प्राप्ती :—**

हिंदू धर्मामध्ये व्यक्तीला, व्यक्ती स्वात्ंयाला काहीच महत्व नसून एका वर्णाने दुस—या वर्णाशी कसे व्यवहार करावेत याचेच निर्देश या धर्मात सापडतात. हिंदू धर्मात व्यक्तीला प्राधान्य नसल्यामुळेच बाबासाहेबांना हिंदू धर्म मान्य नव्हता. व्यक्तीविकास हेच धर्माचे अंतीम ध्येय असले पाहिजे असे त्यांचे ठाम मन होते. व्यक्तीच्या आत्मोन्नतीला पोषक वातावरण निर्माण करण्याचे काम धर्मात करणे अभिप्रेत असते मात्र हिंदू धर्मात तशी तरतुद अजीबात नाही. सहानुभूती, समता व स्वात्ंय या व्यक्तीविकासाला पोषक तत्वांचा संपूर्ण आभाव आहे. आपल्याच धर्मचा भाग असलेल्या अस्पृश बंधावांबद्दल हिंदू लोकांना अजिबात सहानुभूती नाही. त्याचप्रमाणे अस्पृश्य लोक म्हणजे हिंदू धर्मावरील कलंक असे मानल जाते, अपवित्र मानले जाते. जोपर्यंत एखादा अस्पृश्य हिंदू धर्माचा भाग असतो तोपर्यन्त तो कलंकीत, अपवित्रच असतो मात्र त्याने धर्मांतर केल्याबरोबर त्याची अस्पृश्यता नष्ट होते याचे निरीक्षण बाबासाहेबांनी केले होते.''तुमच्यातील जे

मुसलमान झाले त्यांना हिंदू अस्पृश्य मानत नाहीत व असमान लेखीत नाहीत. तुमच्यातील जे ख्रिस्ती झाले त्यांना हिंदू लोक अस्पृश्य मानीत नाहीत व असमान लेखीत नाहीत. नुकताच त्रावणकोर येथे घडलेला प्रकार लक्षात घेण्यासारखा आहे. तेथील थिया जातीतल अस्पृश्य लोकांस रसस्त्यावरुन चालण्याची मनाई आहे. परवाच त्यांच्यापैकी काही जणांनी शीख धर्म स्वीकारल्याबरोबर त्यांच्यावरची बंदी उठवली गेली. या सर्व गोष्टीवरुन एक गोष्ट सिध्द होत आहे की तुमच्या अस्पृश्यतेला व तुमच्या असमानतेला जर काही कारण असेल तर ते तुमचा आणि हिंदू धर्माचा असलेला लागा बांधा हे होय.'' हिंदू धर्मामध्ये समानतेचा पूर्ण अभाव आहे ही बाब त्यांनी आपल्या अनुयायांच्या निदर्शनास आणून दिली होती.

**स्वातंत्र्य प्राप्ती**

हिंदू धर्म व वर्णव्यस्था यामुळे व्यक्तीला व्यक्तीस्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य, नाकारले गेलेले आहे. जन्मत प्राप्त झाले त्या व्यवसायाशिवाय कोणताही व्यवसाय करता येत नाही. शिक्षणाचे स्वातंत्र्य नसल्यामुळे नोकरी प्राप्त करण्याचे स्वातंत्र्यही सहाजिकच नाकारले जाते. ''अस्पृश्य लोकांना कायदेशीर स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याची जास्त जरुरी आहे. सामजिक स्वातंत्र्य जोपर्यंत तुम्हाला प्राप्त झाले नाही तोपर्यंत तुम्हाला कायद्याने कितीही स्वातंत्र्य दिले तरी त्याचा उपयोग नाही.''[५] व्यक्तीला फक्त सामाजिक, शारीरिक, स्वातंत्र्य असून भागत नही तर त्याचे मनही तितकेच स्वातंत्र्य असले पाहीजे. कारण ज्या माणसाचे मन स्वतंत्र्य नाही त्याला बाहय स्वातंत्र्याचा कोणताच उपयोग नसतो असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. ''मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जरी कैदी नसला तरी तुरुंगात आहे, ज्याचे मन स्वातंत्र्य नाही तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्य ही जिवंतपणाची साक्ष आहे''[६]स्वतंत्र माणूस कुणाला म्हणावे याचे अतिशय मार्मीक वर्णन बाबासाहेबांनी केलेले आहे. ''जो आपली बुध्दी जागृत ठेवून आपले हक्क काय, आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय याची जाणीव करुन घेतो, त्याला मी स्वतंत्र म्हणतो, जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कहयात आण्ण्यास सिध्द असतो तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हनतो. जो रुढींच्या स्वाधीन झाला नाही. जो गतानुगतिक बनला नाही, ज्याच्या विचाराची ज्योत विझली नाही, तो स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुस—याच्या शिकवणीने वागत नाही, जो आपल्या हक्कांचा अपहार केला असता त्याच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकुल लोकमताला घाबरुन जात नाही, दुस—याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुध्दी, स्वाभिमान ज्याला आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे. असे मी समजतो'' [७] स्वतंत्र माणसाच्या आपल्या या व्याख्येनुरुप आपल्या समाजाकडे पाहताना बाबासाहेबांना जाणवत होते की, यापैकी कोणत्याही अर्थाने आपला समाज स्वतंत्र नाही आणि हे स्वातंत्र्य त्यांना हिंदू धर्मात राहून अजिबात प्राप्त होणार नाही त्यासाठी धर्मांतर हाच एकमेव मार्ग आहे. ''हिंदू धर्म तुम्हाला दोन त—हेने मारक झाला आहे या धर्माने तुमचे मानसिक स्वातंत्र्य हिरावून घेवून तुम्हाला गुलाम केले आहे व याच धर्माने तुम्हाला व्यवहारात गुलामगिरीच्या दशेत आणून टाकले आहे. तुम्हाला जर स्वातंत्र्य हवे असेल तर तुम्हाला धर्मांतरच केले पाहिजे.''[८]

**अस्पृश्यांच्या संघटनासाठी :—**

अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीतील एक महत्वाची समस्या म्हणजे अस्पृश्य जाती देखील आपापसात अस्पृश्यता पाळत होत्या. इतकेच नव्हे जातीअंतर्गत सुध्दा श्रेष्ठ कनिष्ठ असे भेदभाव केले जात असत. भारतीय हिंदू समाजातील उच्च जातींच्या अनुकरणामधून ही समस्या अस्पृश्य जातींमध्ये शिरली होती. तिचा विनाश करणे ही फार मोठी जबाबदारी अस्पृश्य वर्गावर आहे असे बाबासाहेबांना वाटत होते. ''आपण जातीभेद पाळतो, अस्पृश्यता पाळतो, याचे मुख्य कारण, ज्या हिंदू धर्मात आपण आहोत तो धर्म तसे करावयास सांगतो म्हणून वस्तू कडू असेल तर ती गोड करता येईल. खारट असले, तुरट असेल तर तिची रुची बदलता येईल. पण विषाचे अमृत करता येणार नाही. हिंदू धर्मात राहून जातीभेद नष्ट करु असे म्हणणे म्हणजे विषाचे अमृत करु असेच म्हणण्यासारखे आहे''[९] त्यावेळी अनेक अस्पृश्य स्वता: ची जात सांगताना संकोच करत व 'महार' जातीऐवजी हरीजन, चोखामेळा अशी नावे सांगत अशा स्थितीत जगण्यापेक्ष्या धर्मांतर करुन सरळ ताठ मानेने जगावे असे बाबासाहेबांचे मत होते. 'धर्मांतर हे एका दृष्टीने नामांतरच आहे. धर्मांतराने होणारे नामांतर हे तुम्हाला जास्त फायदेशीर पडेल. मुसलमान

म्हणवून घेणे, खिस्ती म्हणवून घेणे, बौध्द म्हणवून घेणे, शीख म्हणवून घेणे हे धर्मांतर आहेच पण नामांतरही आहे ते खरे नामांतर आहे. या नामांतराला दुर्गंधी नाही. हे नामांतर अमुलाग्र आहे. त्याचा शोध कोणी करु शकणार नाही.''[१०]

हिंदू धर्म म्हणजे आपल्या पूर्वजांवर लादलेली एक प्रकारची गुलामगिरी होती तिला झुगारुन देणे त्यांना परिस्थिती मुळे शक्य झाले नव्हते मात्र आजच्या तरुणपिढीला ते शक्य आहे. पूर्वजांचा धर्म म्हणून हिंदू धर्माला कवटाळून बसण्यात नव्हे तर त्याचा त्याग करुन दुस—या धर्माचा स्वीकार करण्यातच भावी पिढयांचे हित आहे ही गोष्ट बाबासाहेबांनी समाजाला पटवून दिली. धर्मांतराचा मार्ग हा पळपुटेपणाचा मार्ग नसून तो एक शहाणपणाचा मार्ग होता. जितकी स्वराज्याची आवश्यकता भारताला आहे तितकीच धर्मांतराची आवश्यकता अस्पृश्यांना आहे. असे बाबासाहेब सांगत असत.

**धर्मांतरानंतर महारकी वतनाचे काय होईल?**

परंपरेने चालत आलेले महारकीचे वतन हे अस्पृश्यांसाठी अतिशय महत्वाचे होते किंबहुना ते त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन होते. बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेनंतर स्पृश्य लोकांनी अशी अफवा पसरविली की धर्मांतर केल्यास तुमच्या महारकीचे वतन जाईल. त्यावर आपले मत मांडताना बाबासाहेब म्हणाले की, ''महारांना अधोगतीस नेणारी जर कोणती एखादी बाब असेल तर ती महारकी होय. ज्या दिवशी या महारकीच्या बेडीतून तुमची सुटका होईल त्या दिवशी तुमच्या उध्दाराचा मार्ग मोकळा झाला असे मी समजेल''[११] मात्र इतके होवूनही ज्यांना महारकीच्या वतनाची अपेक्षा होती. त्यांना बाबासाहेबांनी आश्वासन दिले की १८५० च्या कायद्यानुसार धर्मांतर केले तरी वारसाच्या किंवा मालमत्तेचया कोणत्याही अधिकारास बाधा येणार नाही. त्यासाठी त्यांनी नगर जिल्हयातील खिस्ती झालेल्या महारांच्या वतनाला कोणताही धक्का न लागल्याचे उदाहरण सर्वांसमोर ठेवले होते.

**समारोप**

धर्मांतरानंतर अस्पृश्यांना मिळालेल्या राजकीय हक्कांचे काय होईल ते संपुष्टात येतील अशी भिती अनेकांनी व्यक्त केली होती. मात्र धर्मांतर केल्यामुळे अस्पृश्यांचे कोणतेही राजकीय नुकसान होणार नाही असे बाबासाहेब ठामपणे सांगत असते. ''धर्मांतराने राजकीय हक्कास धोका नाही. परंतु धर्मांतर केले असता आपल्या राजकीय हक्कांना का धोका बसावा, हेच मला समजत नाही. तुमचे जे राजकीय हक्क आहेत, ते तुम्ही कोठेही गेला असता तुमच्याबरोबर येतील याविषयी मला कोणत्याही प्रकारची शंका वाटत नाही तुम्ही मुसलमान झालात तर अमचे राजकीय हक्क मुसलमान म्हणून तुम्हाला मिळतील. तुम्ही खिस्ती झालात तर तुमचे हक्क खिस्ती म्हणून तुम्हाला मिळतील. तुम्ही शिख झाालात तर तुमच हक्क शीख म्हणून तुम्हाला मिळतील.''[१२] अस्पृश्य समाज ज्या धर्माचा स्वीकार करतील त्यांच्या पंधरा जागा त्यांच्यासोबत त्या समाजात जातील. थोडक्यात अस्पृश्य लोक ज्या धर्मात जातील त्यांचे राजकीय हक्क देखील त्यांच्यासोबत जातील असा विश्वास बाबासाहेबांनी जनतेला दिला होता.

**संदर्भ**


१. बहिष्कृत भारत, शुक्रवार, शुक्रवार ता. २० मे १९२७.

२. मुक्ती कोन पथे, १३ ते १९३६मुंबई.

३. उक्त,

४. उक्त,

५. उक्त,

६. उक्त,

७. उक्त,

८. उक्त,

९. उक्त,

१०. खैरमोड चां.भ.डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड सहावा.

११. उक्त,

१२. उक्त,